# पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण आकुर्डी - पुणे -४११०३५

प्रती,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
आकुर्डी.

दिनांक :

विषय :- पेठ क्र. ____________
अनधिकृत भूखंड व त्यावरील अनधिकृत बांधकामाचे नियमितीकरण महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम,१९६६ मधील कलम ५२ क नुसार करणेबाबत.

संदर्भ :- शासकीय अधिसुचना क्र.टिपीएस-१८१४/प्र.क्र.८२/१४/नियम/नवि-१३, दि.०७/१०/२०१७.

## अनधिकृत/अतिक्रमीत बांधकाम नियमित करणेसाठीचा अर्ज.

महोदय,

भूखंडाचे व त्यावरील बांधकामाचे नियमितीकरण करणेसाठी खाली दिल्याप्रमाणे माहिती सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | अर्जदार(भोगवटाधारकाचे) नाव व रहाण्याचा पत्ता. | |
| २) | मो.नं. | |
| ३) | ई.मेल आयडी | |
| ४) | भूखंडाचा तपशील | १) गावाचे नांव   २) सर्व्हे नं.<br>३) पेठ क्र.   ४) भूखंड क्र. |
| ५) | भूखंडाची चतु:सीमा | पुर्वेस : श्री.------------------------------------------ स.नं.------<br>उत्तरेस: श्री.------------------------------------------स.नं.------<br>पश्चिमेस : श्री.--------------------------------------स.नं.------<br>दक्षिणेस :श्री.---------------------------------------- स.नं.------ |
| ६) | बांधकामाचे क्षेत्रफळ व तपशील | पहिला मजला   चौ.मी.<br>दुसरा मजला   चौ.मी.<br>तिसरा मजला इ.वगैरे   चौ.मी.<br>असे एकूण बां.क्षेत्रफळ   चौ.मी.<br>असे किती मजले आहेत<br>लांबी   मी.,   रुंदी   मी. |

| | | |
|---|---|---|
| ७) | बांधकाम केंव्हा केले. | दिनांक/वर्षे / / |
| ८) | भूखंड किंवा बांधकाम विषयी न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे काय? असल्यास न्यायालयाचे नाव/दावा क्रमांक | होय / नाही. |
| ९) | अ) न्यायालयाची स्थगिती वा इतर आदेश आहे काय? | होय / नाही. |
| | ब) असल्यास त्याचा तपशील व आताची स्थिती नमुद करावी. (न्यायालय, प्रकरण क्रमांक व दिनांक सह) | |
| १०) | प्रक्रिया शुल्क. | रक्कम रु.२००/- पा.क्र. दि. / /२०१७ अन्वये भरणा केला आहे. |

उपरोक्त प्रमाणे सादर केलेली माहिती ही संपूर्ण सत्य असल्याची मी खात्री केली असून असत्य असल्यास त्याबाबत मी भारतीय दंड संहीता कलम १९९, २०० अन्वये वा इतर उचीत कार्यवाहीस पात्र आहे.

प्रकरण शिफारस करणाऱ्या
अभियंता/वास्तुविशारद यांचे
नाव व स्वाक्षरी / शिक्का
मो.नं.

अर्जदार / भोगवटाधारक यांचे नाव व स्वाक्षरी
नांव :-------------------------------------
स्वाक्षरी
मो.नं.

# भोगवटादाराचे बांधकाम नियमितीकरणाबाबतचे हमीपत्र

**(सदर हमीपत्र मान्यताप्राप्त नोटरी यांचे कडून अधिप्रमाणित करुन सादर करावे.)**

मा खाली सही करणार श्री. ------------------------------------------------------------------------------------

राहणार --------------------------------------------------------------------------------------------------------

हमीपत्र करुन देतो ते येणेप्रमाणे.

१) गाव --------------------- सर्व्हे.क्र. ----------------पेठ क्र. ----------------- मध्ये -----------------चौ.मी. क्षेत्रफळाची जागा या जागेचे रेखांकनास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता नसताना त्यावर निवासी / वाणिज्य/औद्योगिक वापर इमारतीचे बांधकाम नवनगर विकास प्राधिकरणाच्या मान्यतेशिवाय दि.३१ डिसेंबर २०१५ पुर्वी केले आहे.

**२) चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.**

| क्र. | लगतच्या भोगवटादाराचे नाव / भौगोलिक खुण | दिशा |
|---|---|---|
| १ | | पूर्व |
| २ | | पश्मिच |
| ३ | | उत्तर |
| ४ | | दक्षिण |

**३**) सदर अनधिकृत बांधकाम प्रशमन शुल्क आकार लावून "प्रशमित संरचना" म्हणून घोषित करण्यासाठी शासन अधिसूचना टिपीएस-१८१४/प्रक्र/८२/१४/ नियम/ नवि-१३ दि.०७/१०/२०१७ नुसार महाराष्ट्र नगर रचना (प्रशमन संरचना) नियम २०१७ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची भूवाटप नियमावली १९७३ यांच्या वेळोवेळी होणाऱ्या आदेशाचे मी पालन करण्याची हमी देतो.

४) **योजनेची जाणीव :** सदर योजना ही अनधिकृत बांधकाम नियमितीकरणाचे योजनेअंतर्गत नियमान्वीत करण्यात येत असून अनधिकृतपणे केलेली जागेची फाळणी व अनधिकृतपणे केलेले बांधकाम नियमान्वीत करण्यासाठी सरकारने उपलब्ध करुन दिलेली एक संधी असल्याची जाणीव मलाआहे.

**५) रस्त्याची रुंदी आहे ती स्विकारणे :** या प्लॉट लगत असणारे रस्ते नियोजन प्राधिकरणाचे नियमाप्रमाणे आवश्यक त्या रुंदीचे राहत नाहीत याची मला जाणीव आहे. जर नवनगर विकास प्राधिकरणास रस्त्याची रुंदी वाढविणे आवश्यक वाटल्यास, त्यासाठी माझ्या प्लॉट मधील लागणारी जागा मी विना मोबदला नवनगर विकास प्राधिकरणाच्या ताब्यात देईल. त्यास कोणताही विरोध करणार नाही व सदर जागेवरील बांधकाम स्वखर्चाने काढून घेईल.

६) **अग्निशामक दलाचे बंब व ॲम्ब्युलन्ससाठी रस्त्याची सोय नसणे** : रस्त्याची कमी रुंदी रहात असल्यामुळे या रस्त्यावरुन अग्निशामक यंत्रणा, ॲम्ब्युलन्स इ. अत्यावश्यक सोई सुविधा माझे जागेपर्यत पोचू शकत नाही. याची मला जाणीव आहे व त्यामुळे निर्माण होणा-या अडचणींबाबत मी भविष्यकाळात कोणतीही तक्रार करणार नाही.

७) या प्लॉटची सरकारकडून अधिकृत मोजणी करुन मला मिळू शकलेली नाही. परंतु जागेवरील प्लॉटची मापे नकाशात दर्शवली असून ती मापे वहिवाटी प्रमाणे आहेत. यामध्ये अन्य कोणाच्याही जागेत मी अतिक्रमण करणार नाही, तसे भविष्यात सिध्द झाल्यास व त्यामुळे कायदेशीर वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबत कोणत्याही प्रकारची तोशीष मी नवनगर विकास प्राधिकरणास लागू देणार नाही. त्याचप्रमाणे मोजणी बाबत नगरविकास प्राधिकरणाने ठरवून दिलेले/ मागणी केलेले शुल्क विना तक्रार भरण्याची हमी देतो.

८) सदरची इमारत बांधताना इमारतीचे बांधकामाचा दर्जा चांगला राहील याची मी काळजी घेतली आहे. तरीसुध्दा जर काही कारणाने इमारतीस धोका निर्माण झाल्यास त्यास मी स्वत: जबाबदार राहील, व त्यासाठी नवनगर विकास प्राधिकरणास तोशीष लागू देणार नाही. याबाबत इमारत सुरक्षिततेची सर्व जबाबदारी माझी / आमची राहील. याबाबतचा स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचा दाखला सादर करत आहे.

९) प्रस्तुत प्रकरणी सादर केलेल्या नकाशात दर्शविलेले बांधकाम मी केले असून या पुढील वाढीव काम मी नवनगर विकास प्राधिकरणाची पूर्व परवानगी घेऊनच करेल. तसेच जे बांधकाम प्रशमन संरचना म्हणून नियमित होणार नाही ते मी माझ्या जबाबदारीवर काढुन घेईल.

१०) मी बांधकाम केलेल्या जागी नैसर्गिकपणे निर्माण झालेला नाल्याचा प्रवाह बंद झालेला नाही / बंद केलेला नाही याची काळजी घेतली आहे. तर प्रवाह बंद झाल्याचे आढळल्यास तो प्रवाह सुरक्षितपणे नवनगर विकास प्राधिकरणाच्या सोईनुसार व नवनगर विकास प्राधिकरणा च्या सुचनेनुसार मोकळा करुन देण्याची माझी जबाबदारी राहील.

११) सदर जागा/बांधकामाबाबत वहिवाटीचे मालकी हक्काबाबत काही वाद, तक्रार, कोर्ट प्रकरण निर्माण झाल्यास त्याचे सर्व निराकरण मी माझ्या वैयक्तिक पातळीवर करीन, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणास कोणत्या प्रकारची तोशीष लागू देणार नाही. तसेच सदर बांधकाम हे ३१ डिसेबंर २०१५ पूर्वीचे असून त्याबाबत आवश्यक पुरावे मी सादर केले आहे. त्यांच्या सत्यतेची मी हमी देतो.

१२) प्रशमित बांधकाम म्हणून नियमान्वीत करण्याचे योजनेत सदरचे प्रकरणास जरी मान्यता मिळाली तरी जरुर त्या नागरी सोई सुविधा मिळण्यास काही कालावधी लागणार आहे. याची जाणीव मला आहे. त्यामुळे दरम्यानचे काळात जशी आहे तशी परिस्थिती स्विकारणेस व याबाबत तक्रार न करण्याची हमी या हमीपत्राव्दारे मी देत आहे.